# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २६/०३/२०२४ (मंगळवार) दुपार**

---

## अवैधरीत्या धारदार व घातक शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक

पो.स्टे. कन्हान :– दिनांक २५/०३/२०२४ चे १७.०० वा. दरम्यान पोलीस स्टेशन कन्हान येथील स्टाफ धुलीवंदन बंदोबस्त पेट्रोलिंग करित असताना माहिती मिळाली की, गोपनीय माहिती मिळाली की, गोंडेगाव कॉलनीमध्ये दोन इसम मोटरसायकलने येत असुन त्यांनी हातात धारदार तलवार बाळगली आहे व लोकांमध्ये दहशत निर्माण करणार आहे. अशा मिळालेल्या माहिती वरून कन्हान पोलीसांनी तात्काळ घटनास्थळी पोहचले असता पोलीस आल्याची चाहुल लागताच मागे बसलेला इसम **फरार अमन प्रेमदास पहाडे रा. गोंडेगाव जुने कन्हान** हा हातातील तलवार खाली फेकुन पळुन गेला. व मोटरसायकल चालविणाऱ्या **आरोपी नामे– अमित नागोराव गजभिये रा. गोंडेगाव कलरी कन्हान** यास ताब्यात घेवुन सदर घटनास्थळाहुन एक धारदार तलवार पुर्ण पणे लांबी ३ फुट ३ इंच, पितळी मुठ त्यावर अर्धचंद्रकार कोर असलेली लांबी ९ इंच स्टिलचे धारदार पाते २ फुट ६ इंच, पात्याची रूंदी ३ इंच किंमती १००० रू. व एक मोटारसायकल जुनि वापरती बजाज कंपनीची डिस्कव्हर मॉडेल असलेली dz- MH 40S7220 कि. १५००० रू. असा एकुण १६००० रूपयाचा माल जप्त केला. आरोपींतांविरूद्ध पोस्टे कन्हान येथे कलम ४, २५ शस्त्र अधि १९५९ महाराष्ट्र पोलिस अधि. १९५१ कलम १३५ अन्वये गुन्हा नोंद केला आहे.

सदरची कार्यवाही मा. श्री. हर्ष ए पोद्दार पोलीस अधीक्षक नागपुर जिल्हा ग्रामीण, मा. श्री रमेश धुमाळ अपर पोलीस अधीक्षक नागपूर जिल्हा ग्रामीण यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि राहुल चव्हान, पोहवा सचिन वेळेकर, पोना अमोन नागरे, महेश बिसने यांनी पार पाडली.

## अटटल गुन्हेगार सुनिल श्रीकृष्ण घरत यास नागपूर जिल्हयातुन हद्दपार (तडीपार)

पोलीस स्टेशन उमरेड हद्दीत पिरावा ता. भिवापूर येथे राहणारा सुनिल श्रीकृष्ण घरत वय २५ वर्ष याचेवर पोलीस स्टेशन उमरेड येथे अनेक गंभीर गुन्हे दाखल आहे. सुनिल श्रीकृष्ण घरत याचे विरुध्द घरफोडी करणे, चोरी करणे, धमकावने असे गुन्हे दाखल आहेत. सुनिल श्रीकृष्ण घरत याचे विरुध्द सन २०१८ ते २०२२ या कालावधीमध्ये विविध कलमांन्वये एकुण ०५ गुन्हे दाखल आहेत. सुनिल श्रीकृष्ण घरत याचे या गुन्हेगारी प्रवृत्तीवर आळा बसावा याकरिता त्याचेवर विविध कलमान्वये वेळोवेळी प्रतिबंधक कारवाई करण्यात आली मात्र या प्रतिबंधक कारवाईलाही न जुमानता त्याचे गुन्हेगारीकृत्य सुरुच होते. त्याचे अशा गुन्हेगारी वृत्तीमुळे परिसरातील नागरिकांच्या मनात भिती निर्माण होवुन नागरिक सहजासहजी त्याचे विरुध्द तक्रार देण्यास उघडपणे समोर येत नव्हते.

करिता पोस्टे उमरेड परिसरात सामाजिक स्वास्थ व सुव्यवस्था कायम रहावी या करिता सुनिल श्रीकृष्ण घरत यास नागपूर जिल्हयातुन हद्दपार करण्याकरिताचा प्रस्ताव पोलीस स्टेशन उमरेड कडुन मा. उपविभागीय अधिकारी, उमरेड

यांना सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावाची पुर्ण चौकशीअंती मा. उपविभागीय अधिकारी, उमरेड यांनी दिनांक ०४/०३/२०२४ रोजी सुनिल श्रीकृष्ण घरत यास नागपूर जिल्हा हद्दीतुन हद्दपार (तडीपार) करण्याचा आदेश पारीत केला. सदर आदेशाची दिनांक २५/०३/२०२४ रोजी सुनिल श्रीकृष्ण घरत याचेवर बजावनी करण्यात आली व त्यास नागपूर जिल्हा हद्दीबाहेर जिल्हा वर्धा येथे नेवुन सोडण्यात आले आहे.

आगामी काळात येणाऱ्या लोकसभा निवडणुकीच्या कालावधीत कायदा व सुव्यवस्था टिकुन राहावी याकरिता पो. स्टे. उमरेडच्या अभिलेखावर असणाऱ्या इतरही गुन्हेगारांवर कडक प्रतिबंधक कारवाई करण्यात येणार आहे. गुन्हेगारी प्रवृत्तीच्या सर्व इसमांवर पो.स्टे. उमरेडचे अधिकारी, अंमलदार तसेच गोपनिय यंत्रणा लक्ष ठेवुन असुन कोणत्याही बेकायदेशीर कृत्याची तात्काळ दखल घेवुन गुन्हेगारांवर वेळीच कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

सदरची कार्यवाही मा. श्री. हर्ष ए पोद्दार पोलीस अधीक्षक नागपुर जिल्हा ग्रामीण, मा. श्री रमेश धुमाळ अपर पोलीस अधीक्षक नागपूर जिल्हा ग्रामीण, मा. श्री राजा पवार, उपविभागीय पोलीस अधिकारी उमरेड विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली पोनि श्री प्रमोद घोंगे, पोहवा मंगेश फेदजवार, पोहवा विष्णु जायभाये, पोना श्रीचंद पवार, पोकों संदिप गुट्टे यांनी यशस्वीरित्या पार पाडली.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**